# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web
www.bmmonline.org

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र**
**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

जानेवारी, २०१५
वर्ष ३५, अंक १

## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

एखाद्या गोष्टीचा निश्चय केला व ते काम करण्यासाठी कामाची तयारी दाखवली, तर त्या अवघड कामात यश जरूर मिळते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे टोरांटो येथील "कला संस्कृती संमेलन". आठ महिने जय्यत तयारीनंतर त्यांनी दोन दिवसाचे संमेलन यशस्वीरित्या पार पाडले. ह्या कार्यक्रमात बृहन्महाराष्ट्र मंडळाचा (बृ. म. मं.) अध्यक्ष या नात्याने मी हजर राहिलो. टोरांटो भाषिक मंडळाच्या अध्यक्षा लीना देवधरे व



**छायाचित्रात: डावीकडून: लीना देवधरे, गंगाधर देशपांडे, योगेश सोमण, दीपिका डॅमेरला, सुनील सूर्यवंशी, आणि अर्चना राणे (राजा परांजपे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा)**

चिटणीस नमिता दांडेकर, व सर्व कार्यकारिणी यांनी कार्यक्रमाचे अतिशय चांगल्या प्रकारे आयोजन केले होते. एक चांगले व नवीन लेखक/निर्माता अशी ख्याती असलेले योगेश सोमण यांची दोन व शिकागो येथील महाराष्ट्र मंडळाचे एक अशी तीन नाटके बघायला मिळाली. सर्व नाटके सद्यकालीन सामाजिक विषयांवर आधारित होती. कथानक हृदयस्पर्शी व रोमांचकारी होते. रीमा लागू, योगेश सोमण व त्यांचे सहकारी यांचा अभिनय बघायला मजा आली. त्याचबरोबर राजा परांजपे प्रतिष्ठान– प्रस्तुत संगीत कार्यक्रम – नाट्यरंग आणि अभंगरंग उच्च गुणवत्तेचा होता. बृ. म. मंडळाच्या 'सारेगम' कार्यक्रमाची टोरांटोमधील प्राथमिक फेरीची स्पर्धा खरोखर स्पर्धात्मक होतीच, पण त्याच बरोबर स्पर्धकांनी सादर केलेली गाणी ऐकण्यातही मजा होती. ह्या कार्यक्रमाच्या निमित्ताने, कॅनडामधे ओंटारिओ राज्यातील मंत्री– पण पुण्याला न विसरलेल्या, अस्सल पुणेकर, अशा दीपिका डॅमेरला यांच्याबरोबर स्टेज शेअर करण्याचाही बहुमान मिळाला.

बृ. म. मंडळाने आयोजित डॉ. प्रकाश आमटे यांच्या आयुष्यावर आधारित मराठी सिनेमाला मंडळांकडून अजूनही चांगली मागणी आहे. ह्या सिनेमाबरोबरच आम्ही आमटेंच्या 'हेमलकसा' येथील प्रकल्पासाठी निधीसंकलन आयोजित केले, त्यालाही अनेक मंडळांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. हा जमलेला निधी भारतात पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र फाऊंडेशनच्या कार्यकारिणीचे सहकार्य मिळाले, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार. ह्या चित्रपटाच्या निर्मात्या समृद्धी पोरे ह्यांच्या गप्पांचा कार्यक्रम सहा मंडळांमधे झाला, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला. आमच्या स्थानिक मंडळाने आयोजित केल्यामुळे मलाही हा चित्रपट बघायला मिळाला, अमेरिकेत हॉलिडेज म्हणजे 'गिव्हिंग टाइम'! यंदा त्यानिमित्ताने डॉ. आमटेंच्या जीवनावर आधारित एक प्रेरणादायी चित्रपट बघायला मिळाला, हे भाग्यच म्हणावे लागेल.

बृ. म. मंडळाच्या २०१५च्या अधिवेशनाबद्दल विशेष सांगायचे म्हणजे ह्या अधिवेशनात पहिल्यांदाच उत्तररंगाची वेगळी परिषद आपण ठेवत आहोत. त्यासाठी 'उत्तररंग'चे कार्यकर्ते अनेक नाविन्यपूर्ण असा चर्चात्मक व माहितीपूर्ण कार्यक्रम करण्यासाठी उत्सुक आहेत. तेव्हा जास्तीतजास्त लोकांनी ह्या परिषदेस उपस्थित रहावे, म्हणजे उत्तररंग परिषदही अधिवेशनाचा एक नियमित भाग होईल. याविषयी सविस्तर माहिती ह्या अंकात उपलब्ध आहेच. ती आपण जरूर वाचा.

१४ जानेवारीला मकर संक्रांत. गेल्या दिवाळीच्या कार्यक्रमानंतर, दोन महिन्यांच्या ब्रेकनंतर, उत्तर अमेरिकेतल्या विविध मंडळांत आता संक्रांत साजरी होईल. तुमच्या आमच्यातला स्नेह तिळातिळाने वृध्दिंगत व्हावा हीच संक्रांतीनिमित्त शुभेच्छा.

लवकरच बोलूयात.

**- सुनील सूर्यवंशी** (अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ)
**suryawanshi@yahoo.com**

## या अंकात ...

वाचकांच्या प्रतिक्रिया, वृत्तासाठी आगामी सदरे २
मराठी मंडळांतून फेरफटका (व्हिडीओ, ऑडिओ स्वरूपात)
LAलकारी ३
कुणि भुइचाफा, कुणि नभजाई ४
मी विठ्ठल पाहिला? ६
बदलते चेहेरे ७
उत्तररंग ८
Book Review: Part of the Family? , चित्र–कल्पना ९
भैरवी १०
ई विभाग: लेख: पुन्हा एकदा 'श्यामची आई,
कविता– देशप्रेम राशिभविष्य,
Story- Kid's Corner: Stroke Play

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक:** कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**सह-संपादक:** वैभव पुराणिक, लॉस अँजलिस, कॅलिफोर्निया

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**

Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966

Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर**

**Printed Copy: $25/ year**

Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातीचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100

पाव पान: $ 65 अष्टमांश पान: $ 50


- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word or Text File सह ईमेलने पाठवावा.
- प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.
- पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी (२०१३–२०१५)**

**मताधिकार असलेले सदस्य**

**मताधिकार नसलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:** | सुनील सूर्यवंशी | रिजफिल्ड, कनेटिकट |
| **सचिव:** | नमिता दांडेकर | टोरांटो, कॅनडा |
| **कोषाध्यक्ष:** | मोहित चिटणीस | सिॲटल, वॉशिंग्टन |
| **सदस्य:** | अमोल फुलांबरकर | वॉशिंग्टन डीसी |
| | अंजली अंतुरकर | डेट्रॉईट, मिशिगन |
| | नितीन जोशी | शिकागो, इलिनॉय |
| | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| | प्रसाद पानवलकर | ऑस्टिन, टेक्सास |

**माजी अध्यक्ष:** आशिष चौघुले, होकेस्सीन, डेलावेअर

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**मैत्र अध्यक्ष:** शिरीष सबनीस, डेट्रॉईट, मिशिगन

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष:** गिरीश ठकार, पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया

**सदस्य:** मोरेश्वर पुरंदरे, बे एरिया, कॅलिफोर्निया

आशिष चौघुले, होकेस्सीन, डेलावेअर



**प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका**

**संकेत स्थळ :** http://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठवण्याचा पत्ता:**

vinata@gmail.com or newsletter@bmmonline.org

Address for sending paper copy material:

**3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503**


## वाचकांच्या प्रतिक्रिया

डिसेंबर २०१४ मधील बृहन्महाराष्ट्र वृत्तातील मोहना जोगळेकर लिखित 'मंडळोमंडळी', डॉ. प्रकाश लोथे ह्यांचा 'क्रॅकबेरी' लेख आणि विनता कुलकर्णी लिखित 'बोल संचिताचे' ही कविता आवडल्याबद्दल अनेकांनी कळवले. सर्वांना धन्यवाद!

## वृत्तासाठी आगामी सदरे

बृहन्महाराष्ट्र वृत्तामधे प्राधान्याने बृ. म. मंडळ आणि उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळांचे उपक्रम, बातम्या, कार्यक्रमांचा आढावा, आगामी अधिवेशन वार्ता, उल्लेखनीय व्यक्तीपरिचय, पुस्तक-परिचय, प्रवासवर्णने, उत्तररंग, ललित साहित्य, वाचकांचा पत्रव्यवहार आणि काही अंकांतून समयोचित विषयांवर लेख/कविता, व्यंगचित्र इत्यादी प्रकाशित करण्यात येते. त्याचबरोबर २०१३ सालापासून दर महिन्याआड काही सदरे-

डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर लिखित "कुणि भुइचाफा, कुणि नभजाई", आणि मोहना जोगळेकर, डॉ. प्रकाश लोथे, राजश्री कुलकर्णी ह्यांची वेगवेगळ्या विषयांवरील लेखमाला सुरू आहे.

**- जानेवारी २०१५** पासून, **डॉ. शिरीष कीर्तने** महिन्याआड नवीन सदर लिहिणार आहेत. आणि प्रतिसादानुसार खालील दोन सदरे सुरू करत आहे.

**- व्हिडीओ-ऑडिओ:** विविध मंडळांच्या कार्यक्रमांची क्षणफित अर्थात दृक्-श्राव्य स्वरूपात कार्यक्रमांचा आढावा.

**- 'आठवणीतील घर':** आपल्यापैकी बऱ्याच जणांनी भारतात असतांना, आणि तिकडून उत्तर अमेरिकेस येण्याचे ठरविल्यावर, शिक्षण, नोकरी, (शिवाय, स्त्रियांच्या बाबतीत माहेर, सासर,) व्यवसाय, आणि हौस ह्या निमित्तानेही एकापेक्षा नक्कीच अधिक घरात वास्तव्य केले. आपल्या जडणघडणीचा अविभाज्य भाग असणाऱ्या आपल्या घरांशी निगडीत रंजक, हृद्य, समृध्द आठवणी शब्दबध्द करून आम्हाला पाठवा. (शब्दमर्यादा १००० शब्द)

धन्यवाद आणि नवीन वर्षानिमित्त शुभेच्छा!

**- संपादक, बृहन्महाराष्ट्र वृत्त**



## मराठी मंडळांतून फेरफटका

### व्हिडीओ– ऑडिओ स्वरूपात

**ॲन आर्बर (मिशिगन) मराठी मंडळ: २०१४ मधील कार्यक्रमांचा धावता आलेख - संकेतस्थळ: click or visit-**
https://www.youtube.com/watch?v=tYbuiF6kVt8

**ब्लूमिंग्टन नॉर्मल मराठी मंडळ चित्रपट: 'ब्लूमगावची आनंदयात्रा'**
https://www.youtube.com/watch?v=LQIKB5DFWG0

## LA लकारी

# बृहन्महाराष्ट्र मंडळ १७ वे अधिवेशन

### लॉस एंजलीस, जुलै ३ ते जुलै ५,२०१५

**'मैत्र पिढ्यांचे जपे वारसा**
**कला संस्कृती मायबोलीचा'**

**- वैभव पुराणिक** (लॉस एंजलीस)



आमच्या दक्षिण कॅलिफोर्नियात या वेळचा मोसम जरा वेगळाच आहे. इथे चक्क गुलाबी थंडी पडली आहे. मंडळींनी आपआपले स्वेटर कपाटातून बाहेर काढले आहेत! ५०–५५ डिग्री– मध्ये आम्ही हुडहुडतो आहोत! कधी नव्हे ते अनेक वर्षांनी पावसानेही हजेरी लावली आहे. अर्थात इथल्या पावसाची आणि मुंबईच्या पावसाची काही तुलना नाही. इथला पाऊस म्हणजे फक्त रिपरिप. मुंबईसारखे पावसाचे तांडव इथे दशकातून एखादवेळाच पहायला मिळते. पण या रिपरिपीने डोंगर धुतले गेले आहेत, हवा शुद्ध झाली आहे. कधी नव्हे ते या वाळवंटात हिरवे अंकुर दिसू लागले आहेत. सृष्टी नटून नव्या वर्षाचे स्वागत करत आहे.

अधिवेशन समितीचे सदस्यही या नवीन वर्षात नव्या जोमाने कामाला लागले आहेत. अधिवेशन उण्यापुऱ्या सहा महिन्यांवर येऊन ठेपले आहे, याची त्यांना जाणीव आहे. संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळींचे स्वागत करण्यासाठी लॉस एंजलीस नगरी सज्ज होत आहे. या लेखापासून जुलैपर्यंतच्या प्रत्येक लेखात अधिवेशनाचे वेगवेगळे पैलू आम्ही आपल्यापुढे उलगडणार आहोत.

या अधिवेशनात भारतातून कुठले कार्यक्रम येणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे. या अधिवेशनाच्या एका रात्रीचे खास आकर्षण **अवधूत गुप्ते** व **वैशाली सामंत** यांचा कार्यक्रम असणार आहे. अवधूत गुप्ते आपल्या सर्वांनाच एक संगीतकार व गायक म्हणून माहीत आहेतच. त्यांनी अनेक गीतेही लिहिली आहेत हे मात्र कमी लोकांना माहीत असेल. झी टिव्हीवरच्या प्रसिद्ध 'सारेगम' कार्यक्रमामध्ये परीक्षक म्हणून आपण त्यांना पाहिले असेलच. परंतु त्याव्यतिरिक्त अष्टपैलू अवधूत गुप्ते 'गुप्ते तिथे खुपते' हा कार्यक्रमही टिव्हीवर करतात. वैशाली सामंत आज नुसत्या मराठीतल्याच नव्हे तर देशातील आघाडीवरील गायिकांपैकी एक गायिका मानल्या जातात. 'लगान', 'ताल' आणि 'साथिया' अशा प्रसिद्ध चित्रपटांसाठी त्यांनी ए. आर. रेहमानच्या संगीत दिग्दर्शनाखाली गाणी गायली आहेत. त्यांचा आणि अवधूत गुप्तेंचा 'ऐका दाजिबा' हा हिंदी गाण्यांचा आल्बम पूर्ण देशात लोकप्रिय झाला आहे. उडत्या चालीच्या गाण्यांपासून हळूवार गाण्यांपर्यंत सर्वच प्रकारची गाणी त्यांनी गायली आहेत. वैशाली सामंत यांनी अनेक गाणी संगीतबद्ध केली आहेत, हे आपल्याला कदाचित माहीत नसेल. अवधूत गुप्ते आणि वैशाली सामंत अधिवेशनातील एक रात्र अविस्मरणीय करतील याबद्दल मला तिळमात्र शंका नाही.

मराठे ज्वेलर्स हे नाव पुणेकरांना नवीन नाही. पुण्यामध्ये हिरे घ्यायचे असले तर मराठे ज्वेलर्सचे नाव सर्वप्रथम मनात येते. मराठे ज्वेलर्सनी आता बृहन्महाराष्ट्र मंडळ परिवाराबरोबर स्वत:ला जोडायचे ठरवले आहे. येत्या अधिवेशनाचे ब्रॉन्झ प्रायोजकत्व त्यांनी घेतले आहे. मराठ्यांचे हिरे घेण्यासाठी आता उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळींना पुण्यापर्यंत जायची आवश्यकता नाही, येत्या अधिवेशनात आपल्याला त्यांच्या बूथला भेट देता येईल.

अधिवेशनाच्या देणगीदारांसाठी अधिवेशन समितीने खास vipservices@bmm2015.org ह्या ईमेलवर सेवा देणे सुरू केले आहे. देणगीदारांसाठी हॉटेल बुकिंगही डिसेंबर महिन्यातच सुरू झाले होते. आपण देणगी दिली असूनही आपल्याशी कोणीही संपर्क साधला नसल्यास, वरील ईमेलवर आम्हाला ताबडतोब कळवावे. हा लेख आपल्या हातात पडेपर्यंत अधिवेशनाची सर्वसाधारण नोंदणी सुरू झालेली असेल. चांगल्या जागा मिळवण्याकरता आपण ताबडतोब http://bmm2015.org या वेबसाइटवर जाऊन नोंदणी करून घ्या. नोंदणीविषयी अथवा इतर कुठल्याही प्रश्नांची उत्तरे आपल्याला info@bmm2015.org या ईमेलवर अथवा ३१० ७७६ ५५९३ या फोनवर मिळू शकतील.

आणि सरतेशेवटी, आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. हे नवीन वर्ष आपल्या जीवनात सुख, समृद्धी आणि आरोग्य घेऊन येवो हीच आमची प्रार्थना.


**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **(800)204-1939**

E-mail: **padmajabapat@yahoo.com**

Website: **visitors-insurance.com**

# कुणि भुइचाफा कुणि नभजाई

**- विद्युल्लेखा अकलूजकर** (रिचमंड, ब्रिटिश कोलंबिया, कॅनडा)



"कुणि भुइचाफा, कुणि नभजाई
कुणि काटेरी, सदाहरित कुणि,
संजीवक कुणि, कुणी विषारी
सर्वांची एकच वनराई!"

**एलिनॉर पेव्हरेल: दीर्घायुषी स्वयंसेविका**

रिचमंड हॉस्पिटलचा गिफ्ट शॉप अधिक मोठा करून नव्या जागेत गेला, आणि त्यातील स्वयंसेवकांचा एक हसरा फोटो आमच्या वृत्तपत्रात चमकला. त्याखाली एकच ओळ एलिनॉर पेव्हरेल हिच्याविषयी होती, की ९३ वर्षाची एलिनॉर त्या शॉपमधे सर्वाधिक काळ म्हणजे ४० वर्षे स्वयंसेवा करते आहे. हे वाचून मी तिला भेटायला त्या दुकानामधे गेले. लाल ओव्हरॉलमधली, लहानशी,



चटपटीत, रसरशीत कांतीची, हुशार निळ्या डोळ्यांवर चष्मा वागवणारी एलिनॉर मला भेटली. मंगळवारी दुपारी दीडपासून साडेतीनपर्यंत – ज्यावेळी काही लोक दुपारच्या झोपा काढत असतील, त्यावेळी – ती एकटी त्या गिफ्ट शॉपमधे खरेदी करायला येणाऱ्या लोकांच्या अविरत ओघाला तोंड देत होती. कुणाला क्रॅकर्स, कुणाला मिंट्स्, कुणाला पुष्परचना, तर एकादीला हातात धरायचा आरसा असल्या गोष्टी नेमक्या जागांवरून, हात वर उंचावून, किंवा खाली वाकून काढून देत होती, व्हेंडिंग मशीन, कॅलक्युलेटर वगैरे सगळं काही वापरून पैसे, पावत्या घेत–देत होती. कॅनडामधे एका पेनीचं नाणं आता विनिमयातून काढून टाकल्यामुळे, २३ सेंट द्यायचे तर नव्या नियमानुसार आठवणीने २५ देत होती. वरती सगळ्यांशी व्यवस्थित हसतमुखाने पण जेवढ्यास तेवढे बोलतही होती. मधूनमधून माझ्याशीही बोलत होती. थोडक्यात, अष्टावधानी विक्रेती असल्याचा मला अनुभव देत होती. थोड्या वेळाने तिचा त्या दिवशीचा स्वयंसेवक सहकारी तिथे आला. तो एक सोळा–सतरा वर्षे वयाचा शीख विद्यार्थी होता, त्यानंतर त्याच्याकडे गल्ल्यावरचे काम सोपवून ती दुकानातच जरा बाजूच्या शेल्फावर टेकली, आणि मला तिने तिची कहाणी सांगितली.

१९२२ मधे ती सस्कॅच्युवानमधे, एका शेतावर जन्मली. तिथे जमीन घेऊन शेती करणारे तिचे वडील स्वीडिश वंशाचे होते, आणि आई ब्रिटिश कनेडियन होती. पाठोपाठ झालेली चार मुलं, आणि सस्कॅच्युवानच्या प्रेअरीजमधे अगदी कमी साधनांच्या दिवसात लांबचलांब शेतावर काबाडकष्टाचे एकाकी दिवस काढणे तिच्या आईला कठीण झाले असावे. ती या मुलांना लहान वयातच सोडून घरातून कुठेतरी निघून गेली. आणि मग आईविना, या ना त्या हाउसकीपर्सच्या मदतीने आम्ही वाढलो, असे एलिनॉर सांगते. शेवटी त्यातल्याच एका हाउसकीपरशी वडिलांनी लग्न केले, आणि त्यानंतर या मुली सज्ञान झाल्यावर त्या एकापाठोपाठ एक घर–शेत वगैरे सोडून बाहेर पडल्या. ती म्हणाली, की शेतावर राहणे आपल्याला अजिबात आवडत नव्हते, कारण तिथे फारच एकाकी आयुष्य होते. आपल्याला लग्न करून मुलाबाळांचा संसार थाटायचा होता. १९४५ मधे तिची एक चुलतबहीण एडमंटनला जायला निघाली, तिच्याबरोबर एलिनॉर निघाली आणि हिचहाइक करीत आली, तिथून व्हँकूव्हरला पोचली. १९४८मधे तिने बिल पेव्हरेलशी लग्न केले. तो त्याआधी दुसऱ्या महायुद्धात सैन्यातून पाय गमावून परतला होता. युद्धात जखमी होऊन परतलेल्यांना सरकारी नोकरीत सामावून घेत असत, तसा तो कनेडियन इमिग्रेशन विभागातच नोकरी करीत होता. लग्नानंतर त्याच्याबरोबर एलिनॉर विनिपेग, ग्रँड प्रेअरीज, ऑटावा, आल्बर्टा वगैरे अनेक ठिकाणी जाऊन राहिली. आणि शेवटी १९७३ पासून व्हँकूव्हरला परतली, आणि तेव्हापासून आमच्या शहरात, रिचमंडमधे राहते आहे. एक मुलगा आणि एक मुलगी असे तिचे आटोपशीर कुटुंब होते. ती म्हणाली, "त्या काळात नवऱ्याच्या पगारातच आम्ही भागवत असू. मी बाहेर नोकरी अशी कधी केलीच नाही. मुलं शाळेत जात, त्यावेळी मी या दुकानात येत असे, आणि त्यांच्या परतीच्या वेळेपूर्वी घरी जात असे. पहिल्यापासूनच मला हेच काम करायला खूप आवडायचे." त्यामुळे १९७४ पासून या रिचमंड हॉस्पिटलच्या गिफ्ट शॉपमधे स्वयंसेविका म्हणून ती काम करू लागली, आणि तेव्हापासून आजतागायत ४० वर्षे अव्याहत तिथे स्वयंसेवा करते आहे.

चार वेळा हे दुकान हॉस्पिटलमधेच वेगवेगळ्या जागांमधे हालले, आणि त्या सर्व दिवसातही एलिनॉर तिथे विक्रेतीचे काम करत राहिली. काही काळ ती स्वयंसेवकांची संघटकही होती. सत्तर –ऐंशी वयाची असतानादेखील रविवार सोडून सहा दिवस ती तिथे स्वयंसेवा करायला येत असे, कधी खिसमसच्या दिवशीदेखील ती दुकानात काम करत असे. अलिकडे मंगळवार आणि रविवार हे दोनच दिवस येते. हॉस्पिटलमधल्या डॉक्टर–नर्सेस, डायटिशियन, टेक्निशियन, सफाई–कामगार, आणि इतर कामकरी सगळे तिला चांगली ओळखतात. कित्येकांना तर ती आपल्या घरच्या आई–आजीपेक्षाही अधिक माहितीची, ओळखीची वाटते. मी तिच्याशी बोलत असताना यातले कित्येक जण दुकानात डोकावून, केवळ एलिनॉरला हटकून, तिच्याशी दोन शब्द बोलून मगच आपल्या कामाला गेलेले मी पाहिले. एक बाई येऊन तिची चौकशी करून, तिला अँम्ब्रोसिया जातीचे एक रसरशीत सफरचंद देऊन गेली. रविवारी मी पुन्हा तिथे गेले तेव्हा तिची अनेक वर्षांची जुनी सहकारी डेनिश कनेडियन साया नुसती तिला भेटायला आलेली होती. नव्वदीच्या पुढची हसरी, तरतरीत एलिनॉर हा या लोकांच्या ताणाच्या दिवसातला एक विरंगुळा, एक हिरवळ, एक हक्काचा भोज्ज्या असावा, असे मला वाटले.


एलिनॉरच्या आयुष्यात दु:खद प्रसंग अर्थातच आले. लहानपणी आईची माया लाभली नाही. नंतर चाळीसएक वर्षांचा संसार केल्यावर तिचा नवरा १९८९मधे वारला. पण तिची मुलगी त्याआधीच फक्त १९ वर्षांची होऊन वारली. तेही दु:ख तिने झेलले. आता मुलगा तेवढा आहे, आणि तो सध्या कामातून निवृत्त होऊन थायलंडमधे राहात असतो, पण "आपण तुझी काळजी घेऊ तुला गरज पडल्यावर" असे त्याने तिला म्हणे आश्वासन दिले आहे! त्याच्याशी संपर्क रहावा, म्हणून त्याने तिला जेव्हा कंप्यूटर घेऊन दिला, तेव्हा ती त्याच्यावर इ–मेल करायला शिकली. पण त्यावरचे फेसबुक, किंवा इतर गोष्टी, किंवा सेलफोनदेखील ती वापरत नाही, कारण आपल्याला त्याची गरज वाटत नाही, असे ती म्हणते. पण ती सतत वाचते. कथा कादंबऱ्या तर वाचतेच, शिवाय रोजची वृत्तपत्रेही वाचते, आणि त्यातल्या तिला महत्त्वाच्या वाटणाऱ्या बातम्यांबद्दल सगळ्यांशी संवादही करते. रिचमंडमधल्या घरांच्या तेव्हांच्या आणि आत्ताच्या किंमती, नुकता पसरू पाहणारा 'इबोला'चा धोका, भारतातील मुलींवर होणारे अत्याचार, चिनी लोकांचे रिचमंडमधील वास्तव्य अशा कितीतरी विषयांवर तिने मला प्रश्न विचारले, आणि माझे विचार नीट ऐकून घेतले. स्वत: जास्त बोलण्याऐवजी ती समोरच्याला प्रश्न करते, आणि ऐकूनऐकून बरीच माहिती जमवते. ती बहुश्रुत आहे, आणि तिची बुद्धी तल्लख आहे. इमिग्रेशन विभागातल्या नवऱ्याच्या नोकरीतल्या अनुभवांमुळे तिचा सामाजिक दृष्टिकोन व्यापक झालेला आहे. जगभरातील वेगवेगळ्या स्थलांतरित आगंतुकांनीच हा देश घडवलेला आहे, हे तिला चांगले माहीत आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती, हेही ती जाणते, म्हणून "सगळे चिनी वाईट ड्रायव्हर्स असतात", किंवा "सगळे भारतीय बाप मुलींना छळतात" असली निव्वळ ढोबळ विधाने ती कधी करीत नाही. प्रत्येकाशी, प्रत्येकीशी डोळ्याला डोळे भिडवून बोलते, आणि स्वत:चे निष्कर्ष काढते.

दुसऱ्या खेपेला स्वत: केलेला ब्लॅकबेरी जॅम मी तिला घेऊन गेले. ती गोडबीड खाते का नाही, हे माहीत नसल्यामुळे भीतभीत नेला होता, पण ती म्हणाली, की ती शेतावर वाढलेली मुलगी आहे. त्यामुळे ती खात नाही, असं फारसं काही नाही. फारतर चिकनलिव्हर्स किंवा खूप मसालेदार जेवण तिला अलिकडे पचत–मानवत नाही. पण बाकी सगळं खाते, आणि गोड तर अलिकडे तिला विशेष आवडतं. आज घरी जाऊन ती ॲपल पाय बेक करणार आहे, हेही तिने मला सांगितले. साया म्हणाली, की एलिनॉर छान स्वैपाक करते. मफिन्स, केक्स वगैरे तर छानच बनवते. हॉस्पिटलजवळच एका अपार्टमेंटमधे एलिनॉर एकटी राहते, आणि स्वत:चा स्वैपाक, घरसफाई, घरकाम सगळे स्वत:च उरकते. तिथून गाडी चालवत येते कामाला. तिच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना अजून दोन वर्षांचा आहे म्हणाली ती. कारण नव्वदीची झाली, तेव्हा तिच्या डॉक्टरने तिला तपासून सर्टिफिकेट लिहून दिले, की "ती चांगली खणखणीत अशी वृद्धा आहे." आणि तिने आपले लायसन्स ठेवले. नाहीतरी त्याच्यापेक्षा माझी दृष्टी अधिक चांगली आहे!" असे म्हणून एलिनॉर हसली! विनोद करून हसायला तिला आवडते.

तुझे छंद काय असे मी तिला विचारले, तेव्हा म्हणाली, की फारसे नाहीत. पूर्वी विणत असे, बाळासाठी स्वेटर्स, शाली वगैरे विणून त्या दुकानात विकायला ठेवीत असे, आणि त्या काळात फॉक्सट्रॉट, वॉल्त्झ, वगैरे नाचही करीत असे. खूप पूर्वी बेसबॉलही खेळत असे, पण अलिकडे ती काहीच करीत नाही. आपण फारसा व्यायाम वगैरे करीत नाही, पण कॅरीन झेब्रॉफ या बाईचे पुस्तक वाचून योग मात्र करते, म्हणाली. मी म्हटलं, खरं का? तर हसून म्हणाली, पूर्वी जरा अधिक करीत असे, पण आता काय झालंय कुणास ठाऊक. उकिडवं बसताच येत नाही. साधं खाली बसून वर उठायलाही अलिकडे भरपूर वेळ लागतो. पण तरी या दुकानात ती तीन तास उभी असते, आणि एरवीही ती चालते. ती ऑपेरा ऐकायला किंवा नाटकसिनेमा बघायलाही जात नाही, पण रोज टी.व्ही. पाहते, आणि "इथे दुकानामधे काम करायला येणे, हीच सगळ्यात मोठी करमणूक असते, कारण इथे दरदिवशी हरतऱ्हेचे लोक पाहायला मिळतात आणि या सगळ्यांशी गप्पा मारल्यामुळे माझा वेळ छान जातो."

तिच्या वडिलांच्या बाजूने तिला दीर्घायुषी जनुके मिळाली असावीत, कारण तिचे वडील, आत्या वगैरे सगळे शंभरीपर्यंत जगले होते. "काही लोकांची काठी लांब असते, काहींची तोकडी असते." अशा शब्दात तिने दीर्घायुष्याबद्दलचे तिचे मत सांगितले. त्यासाठी आपण फारसं काही वेगळं करीत नाही म्हणाली. पण तिची जीवनाकडे पाहण्याची नितळ दृष्टी, आणि लोकांसाठी हे सेवाभावी काम सतत आनंदाने करीत राहणे, या दोन गोष्टींचा तिच्या दीर्घायुष्याशी घनिष्ठ संबंध असलाच पाहिजे. रिचमंडच्या सीनियर रिक्रिएशन सेंटरमधे ती कधी जात नाही, कारण "तिथे जाऊन सगळे लोक आपआपल्या दुखण्यांबद्दल एकमेकांना सांगत बसतात, कोणाला ऐकायला आवडेल तसलं बोलणं उठसूट?" उलट हॉस्पिटलांत काम करणाऱ्या लोकांचे बोलणे तिला अधिक आवडते, कारण ते लोक सदैव नव्या वैज्ञानिक सुधारणांबद्दल, रोगनिवारणातील संशोधनांबद्दल बोलतात, आणि बहुतेकांचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. लहानांना संदेश काय देशील, असे विचारल्यावर ती म्हणाली, "तुमच्या पूर्वजांबद्दलची माहिती आत्तापासून गोळा करायला लागा, कारण काही काळानंतर विचारायलादेखील कोणी लोक राहात नाहीत. आणि समाजाला सेवा देत राहा, म्हणजे तुमचं आयुष्य कारणी लागतं."


**अनिवासी भारतीय स्त्रियांच्या भावनांची मनोवेधक कहाणी:**



**What a Paradise!**

**स्मिता काळे ह्यांच्या मनस्वी लेखणीतून उतरलेल्या चार विलक्षण व्यक्तिरेखा.**

**खालील संकेतस्थळांवर उपलब्ध:**

**Flipkart :** http://www.amazon.com/What-Paradise-Smita-Kale/dp/1482836785

**Amazon:** http://www.amazon.com/What-Paradise-Smita-Kale/dp/1482836785

**Barnes & Noble:**
http://www.barnesandnoble.com/w/what-a-paradise-smita-kale/1120432719?ean=9781482836790&itm=1&usri=9781482836790#customerReviewsTab

# मी विठ्ठल पाहिला?

**वारी अनुभव - लेख क्र. ५: सासवड ते जेजुरी १८.५ किमी!**

**- राजश्री कुलकर्णी** (साऊथ ब्रुन्सविक, न्यू जर्सी)

'कऱ्हेचे पाणी' आत्मचरित्र लिहिणारे सुप्रसिध्द लेखक प्र. के. अत्रे यांचं जन्मस्थान 'सासवड! एक दिवसाच्या मुक्कामानंतर, आज या सासवडहून 'जेजुरी' येथे प्रयाण होतं. सासवडच्या मुक्कामात फक्त झोपण्यापुरती (अमेरिकेतील मित्र, निलेश किकलेच्या आई–वडिलांच्या) घरी जात होते. त्यांना मी पूर्वी भेटलेदेखील नव्हते. परंतु, काका–काकूंनी खूप प्रेमानी काय हवं–नको ते बघितलं. वारीच्या प्रवासात पदराला बांधलेल्या ऋणांच्या अनेक गाठीत, काका–काकूंच्या प्रेमाची अजून एक गाठ बांधली. कित्येक दिवसांनी काल, सलग सहा तास, शांत झोप लागली. सकाळी साडेपाच वाजता जाग आली आणि सातच्या सुमारास 'तळा'जवळील दिंडीमध्ये सहभागी झाले.

**तळ -** मोठ्ठी जागा, जिथे समस्त वारीतील लोकांची आणि पालखीची थांबण्याची जागा असते.

**मुक्काम -** प्रत्येक छोट्या–छोट्या समूहासाठी (दिंडीसाठी), प्रत्येक गावात निरनिराळ्या ठिकाणी, सोयीसाठी जागा (एकाच ठिकाणी खूप गर्दी होऊ नये म्हणून) ठरवून दिलेल्या आहेत. या मुक्कामाच्या जागा (धर्मशाळा, सार्वजनिक शाळा किंवा तत्सम जागा), तळापासून जवळपास असतात. रात्रीचा मुक्काम झाल्यानंतर, तळापासून जेंव्हा दिंड्या निघतात, तेंव्हा जास्तीत जास्त वारकरी, तळापासून पालखीत सामील होतात. कारण तळापासून सामील झाल्यानंतर, संपूर्ण दिवस चालताना, त्या त्या वारकऱ्यांची, ती ती जागा ठरली जाते.
दिंडीत चालणारे वारकरी, शिस्तीत चालतात. पण दिंडीसोबत न चालणारे वारकरी मात्र, कसेही जशी जागा मिळेल, तसे चालतात, त्यामुळे दिंडीतून कडेला चालणाऱ्या वारकऱ्यांना धक्के खात, जावं लागतं. आणि बहुधा नवीन सामील झालेल्या वारकऱ्यांना कडेने चालावं लागतं. कारण दरवर्षी येणाऱ्या वारकऱ्यांच्या नेहमीच्या जागा ठरलेल्या असतात.

**दिंडीची रचना -** प्रत्येक दिंडीमधे सर्वप्रथम ध्वजधारक, त्यानंतर डोक्यावर तुळस घेऊन जाणाऱ्यां बायका, त्यामागे विणेकरी, नंतर टाळकरी, मग पखवाज वाजवणारे आणि शेवटी वारकरी, असा क्रम ठरलेला असतो.

वारकरी, रस्त्याच्या उजव्या बाजूला पुरुषांच्या चार (किंवा जास्त) रांगा आणि रस्त्याच्या डाव्या बाजूला स्त्रियांच्या (दोन किंवा तीन) रांगा या पध्दतीने चालतात. दिंडीच्या अगदी उजव्या बाजूने ट्रक्स किंवा इतर वाहने जातात, त्यांमुळे दिंडीत न चालणाऱ्या लोकांना रस्त्याच्या डाव्या बाजूनंच चालावं लागतं. आणि मग माझ्यासारख्या नवीन वारकऱ्यांना, कडेने जाणाऱ्या ग्रामीण लोकांचे, त्यांच्या सामानाचे किंवा तुळशी–वृंदावनासारख्या वस्तुंचे, दिवसभर धक्के खाण्याशिवाय पर्यायच नसतो. परंतु, कुठलीतरी अज्ञात शक्ती माझी सतत पाठराखण करीत होती, हे नक्की. कारण, या दिंडीमधे – क्रमांक ४च्या रथापुढे, देशमुख दिंडी आणि शेडगे–पाटील कंपनीचे लोक एकत्र चालत होते. तेथेच मला (नुकतीच 'केरळ ट्रिप'मधे ओळख झालेली) एक मैत्रीण भेटली. 'केसरी टूर्स'च्या चाळीस लोकांच्या ग्रुपमधली ती एक मैत्रीण- रोहिणी! ट्रीपमध्ये ती काहीशी अबोल आणि शांत असायची. तिचे सासरे 'शेडगे–पाटील'कंपनीचे एक संस्थापक होते. तिचे पती उत्तम पखवाज वादक असून ते दरवर्षी वारीला येत. परंतु रोहिणी मात्र यावर्षी, प्रथमच वारीसाठी आली. याच वर्षी तिला वारीसाठी येण्याची इच्छा व्हावी, ती माझ्याच पालखीत असावी, लाखो लोकांच्या प्रचंड समुदायात मला भेटावी, आणि तिनंच मला ओळखावं, हा योगायोग केवळ अनाकलनीय होता. तिच्यामुळे मला दिंडीत आतल्या बाजूने चालण्याची मुभा मिळाली. सुरुवातीच्या चार दिवसांमधे, कडेने चालताना लागणारे धक्के आणि खरचटणं कमी झालं.


छायाचित्रात डावीकडून:
चित्रा भावे, राजश्री कुलकर्णी, आशाताई थत्ते

दुपारच्या जेवणात बुंदीचा लाडू, बटाट्याची भाजी–पोळी, लोणचं असा बेत होता. शाळेची जागा छोटी होती, त्यामुळे हा सगळा स्वयंपाक सासवडहूनच निघताना सोबत करून घेतला होता. इथे फक्त वाटायचं काम होतं.

जेजुरीला पोहोचेपर्यंत अजून एके ठिकाणी विसावा घेतला.



उसाचा रस घेतला, थोडा आराम केला, आणि इतर वारकऱ्यांसोबत पुढे निघाले.

रात्री 'देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटीज ट्रस्ट' वाड्यात मुक्काम होता. दिवसभर उन्हात चालून, त्या रात्रीपर्यंत, संपूर्ण हात आणि पाठ घामोळ्यांनी भरले होते. त्यातच आम्ही साडी घालत नाही, म्हणून वर्षानुवर्षे येणाऱ्या काही वयोवृध्द लोकांनी व्यवस्थापकांकडे तक्रार केली. पण वारीतीलच काही लोकांनी माझी अवस्था बघून मला पाठीशी घातलं. एकतर तिथल्या वारकऱ्यांमधे वयाने लहान, अमेरिकेत राहणारी, साडीची विशेष सवय नसलेली, शिवाय आता तर सनकोट घालूनही घामोळ्यांनी भरलेली! त्यामुळे त्यांना माझी करुणा आली असावी. **(क्रमशः)**

# बदलते चेहेरे

**- डॉ. शिरीष कीर्तने** (ओर्‌लँडो, फ्लोरिडा)



बरेच वर्षे मी वैद्यकीय व्यवसाय (मेडिकलक्षेत्रात प्रॅक्टिस) करत असल्याने (मेडिसिनची जर प्रॅक्टिस असते तर मग डॉक्टर्स चार्ज का करतात, असा प्रश्न बऱ्याच रुग्णांनी (पेशंट्‌स्‌नी) मला विचारला आहे) या व्यवसायात काही गोष्टी लक्षात येतात, काही खटकतात, काही आवडतात. पण एक गोष्ट नक्की, की भारतातले मेडिसिन आणि अमेरिकेतले मेडिसिन यामधे जमीन–अस्मानातला फरक आहे अमेरिकेत सध्या रेशनिंगबद्दल (अर्थात मेडिसिनमधले), चर्चा चालू आहे. इथे असे रेशनिंग आहेच, पण भारतात तर ते पूर्वीही नेहमीच असायचे. पण मी जी गोष्ट सांगणार आहे ती बऱ्याच वर्षांपूर्वी झालेली असली, तरी माझ्या मनात रुतली आहे. म्हणतात ना, आपल्या पहिल्या गोष्टी–पहिले प्रेम, पहिला किस्स, पहिली डेट – कधीच विसरता येत नाही तसेही असू शकेल. पण 'रमिला'ला विसरणे मला शक्य नाही.

रमिला ही एक १४–१५ वर्षाची मुलगी. मी जेव्हा माझी रेसिडेंसी सुरू केली तेव्हा दाखल झालेली एक पेशंट. खाता येत नाही, उलट्या होतात आणि वजन कमी झाले, म्हणून हॉस्पिटलमधे आलेली. मग पोटाचा क्षय/ट्युबरक्युलॉसिस(टीबी)झाल्याचे निदान करण्यात आले. तिची फुफ्फुसे बरी होती त्यात काही टीबी नव्हता. पण पोटाच्या तपासणीत मात्र एक वेगळीच बाब निदर्शनास आली. मळलेली कणिक जशी हाताला लागते, तसे तिच्या पोटाला हात लावला की वाटायचे. तिच्या टीबीवर उपचार सुरू झाले. त्यावेळी आम्ही तिला ३–४ औषधे द्यायचो. त्यातले एक म्हणजे इन्जेक्शन – हिला कुल्ल्यावर मांसच नव्हते, त्यामुळे असे इन्जेक्शन देताना तिला बरेच दुखायचे. पण करणार काय? इन्जेक्शन्स देणे भाग होते. ह्याशिवाय आणखीन गोळ्या द्यायला लागायच्या. त्यातल्या एका गोळीचा साधारण चार ग्रॅम्सचा डोस दिवसांतून तीन ते चार वेळा द्यायला लागायचा. त्या गोळ्यांनी तिला अगोदरच असलेली मळमळ अजूनच व्हायची. पण करणार काय? नवी औषधे फारच महाग होती. ती हिला कशी परवडणार? असेच, दोन–अडीच महिने गेले. तिची प्रकृती सुधारत होती, अंगावर थोडे मांस चढत होते, खाणे सुधारत होते. तेव्हा मग मी तिला घरी पाठवायचे ठरवले, पण ह्या बातमीने तिचे वडील फारसे उत्साही झाले नाहीत. एक तर घरी खायला काय देणार, की ज्यामुळे हिचे वजन वाढेल, आणि दुसरे म्हणजे घरी हिची काळजी कोण घेणार? असे प्रश्न त्यांच्यापुढे होते. पण मी तरी काय करणार? तिचा इन्जेक्शन्सचा कोर्स पुरा झाला होता आणि आता नुसत्या गोळ्या घ्यायच्या होत्या. नाईलाजाने तिचे वडील तिला घरी न्यायला तयार झाले.

माझ्या हॉस्पिटलमधे आठवड्यातून एक दिवस बाह्यरुग्ण विभागाचे क्लिनिक असायचे. भारतात त्याला औटर पेशंट डिपार्टमेंट/ओपीडी आणि अमेरिकेत इमर्जन्सी डिपार्टमेंट/इडी म्हणतात. रमिलाला घरी जाऊन साधारण चार आठवडे झाले असतील. आणि अचानक तिचे वडील तिला घेऊन क्लिनिकमधे आले. सध्या अमेरिकेत हेल्थ केअर रेशनिंग आहे असा बोलबाला आहे. (अर्थात ह्या लोकांनी खरे रेशनिंग काय असते ते कधीच पाहिलेले नाही.) त्यावेळी प्रत्येक मेडिकल युनिटला एक्सरे फिल्मचा कोटा असायचा. त्यामुळे आम्ही नुसतेच स्क्रीनिंग करायचो. जेव्हा तिची तपासण्याची वेळ आली, तेव्हा तिच्या वडिलांनी मला सांगितले की "हु अजे एने घरे लयी जवानो नथि." तिला परत उलट्या सुरू होत्या. आता घराचे खाणे जेमतेम, त्यात औषधे म्हणजे पोटाला आणखीन त्रास! तिचे पोट थोडे मोठे वाटत होते. पण मी अशी कुठली चाचणी करू शकणार होतो, की ज्याने मला १००टक्के सांगता येणार होते, की तिला अजून काही आजार झालेला नाही. "ही तुमचीच मुलगी आहे असे समजा, आणि काहीतरी करा" अशी हा ३७ वर्षाचा बाप मला– २३ वर्षाच्या तरुणाला– विनंती करत होता. मी काय बोलणार? पण तो हट्टाला पेटला होता. "साहेब  काच मा जोई लो. स्क्रीनिंग करा." त्याच्या समाधानासाठी मी रमिलाला स्क्रीनिंग करायला घेऊन गेलो. स्क्रीनिंग केले, आणि मलाच धक्का बसला. स्क्रीनिंगमधे तिला "Air Fluid Level" होते. टीबीमुळे तिची आतडी ब्लॉक झाली होती. आणि ह्यावेळी मात्र तिला खरोखर हॉस्पिटलची जरुरी होती. मी सर्जिकल रेसिडंटला बोलावले आणि तिला सर्जिकल वार्डमधे दाखल केले. आमच्या ओपीडीमधे रुग्णांची एव्हढी वर्दळ असायची, की आम्हा डॉक्टर्सना जेवायला पण वेळ मिळायचा नाही. त्यामुळे कामात मी रमिलाला विसरलो. दुसऱ्या दिवशी माझे पेशंट पाहून झाले. दुपारचे दोन वाजले होते. माझ्या लक्षात आले, की एव्हाना रमिलावर शस्त्रक्रिया/सर्जरी झाली असणार. म्हणून मी सर्जिकल वॉर्डमधे गेलो. मला आश्चर्याचा धक्का बसला! तिची सर्जरी झाली नव्हती. मी तिच्या नर्सशी बोललो, तेव्हा कळले, की तिच्या वडिलांनी सर्जरी करायला नकार दिला. मला काय करावे ते सुचेना. त्यावेळी माझ्याकडे आणि रमिलाच्या वडिलांकडेही फोन नव्हता. मी नर्सला सांगितले, की रमिलाचे वडील येताच मला निरोप पाठव. (त्या काळात वॉर्ड–बॉय असे निरोप/मेसेज लिहिलेली वही घेऊन आमच्या खोलीवर यायचा.) संध्याकाळी मला निरोप आला, की रमिलाचे वडील हॉस्पिटलमधे आलेले आहेत. मी त्यांच्याशी बोलायला गेलो. त्यांनी ऑपरेशन करायला नकार दिला. तसा वेळ पण बराच गेला होता. त्यामुळे शस्त्रक्रियाही कितपत यशस्वी होणार, ह्याची मला खात्री नव्हती. रमिला दुसऱ्या दिवशी गेली. हा भारतीय टीबीचा मी पाहिलेला चेहरा. त्यानंतर पोटाचा टीबी मी तरी अमेरिकेत कधी पाहिला नाही. याचे एक कारण म्हणजे अमेरिकेत मिळणारे सर्व दूध हे पाश्चराईज्ड (जंतुविरहित) असते आणि गुरांना टीबी झालेला नसतो.

**आता अमेरिकन टीबीचा चेहरा –**

माझ्याकडे एक ३५–३७ वर्षाची महिला रुग्ण तपासणीसाठी आली. तिला दोन महिने खोकला झाला होता. खोकल्यात थोडासा

पांढरा कफ पडायचा. ताप नव्हता, पण भूक थोडी कमी झाली होती. पण तिचा स्वत:च्या घटस्फोटाविषयी खटला चालू असल्याने, तिची भूक कमी झाली असा तिने निष्कर्ष काढला होता. खूप बोलल्यावर आणि खूप हसल्यावर तिला खोकला यायचा. तिच्या डॉक्टरने तिचा एक्स–रे केला होता, आणि तो अहवाल ठिक होता असे मला सांगण्यात आले होते. मी तिचे निदान दमा (asthma–ॲस्मा) म्हणून केले. आणि तिची श्वास चाचणी केली. ती देखील दम्याचे निदान सुचवीत होती. त्यानुसार मग तिच्यावर उपचार केले. आणि तिचा खोकला बराच सुधारला, पण पूर्णपणे गेला मात्र नाही.

त्यानंतर मी तिचा पूर्वीचा एक्स–रे पाहण्यासाठी मागवला. त्यात मात्र वरच्या बाजूला दोष आढळला. मग मी तिची श्वासनलिकेची तपासणी (Bronchoscopy) केली. त्यातून लगेच काही निष्पन्न झाले नाही. पण दोन आठवड्याने मला फोन आला. त्यानुसार या रुग्णामधे टीबीची वाढ दिसली. म्हणजे हिचा खोकला टीबीमुळे होता. अर्थातच मला तिला ऑफिसमधे बोलावून सर्व काही सांगायला लागले. पण येथेच जर गोष्ट थांबली असती तर त्यात विशेष ते काय? ही बाई एका लॉ फर्ममधे कामाला होती. तिला नवरा होता आणि आठ/नऊ वर्षाची एक मुलगी होती. तिचा घटस्फोटाचा खटला चालू होता. मग काय विचारता, मला तिच्या निरनिराळ्या तीन वकिलांचे फोन आले. पहिला म्हणजे हिच्या एम्प्लॉयरचा हिच्या टीबीमुळे कोणाला टीबीतर होणार नाही नं, कोणाला काय तपासणी करायला लागतील, त्यापैकी कुणी संसर्गजन्य असल्यास इतरांपासून दूर ठेवायला लागणार नाही ना?... अनेक प्रश्न! मी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली, पण मला माहीत होतं, की हा माणूस साधा माणूस नसून एक वकील आहे; आणि तो सुध्दा अमेरिकेतला! मला जेवढी उत्तरे देता आली तेव्हढी दिली. विचार केला की, शंका आल्यास पुढे संसर्गजन्यरोगतज्ञाला विचारता येईल. दुसरा फोन आला तो तिच्या नवऱ्याच्या वकिलाचा. हिच्या मिठी मारण्याने आणि मुके घेतल्याने तिच्या मुलांना टीबी व्हायची किती शक्यता, असा त्याचा प्रश्न होता. त्याला समजून सांगितले, की त्या मुलांना टीबीची चाचणी करायला लागणार होतीच. तिच्या मुके घेण्याने त्यात काही फरक पडणार नव्हता. मला वाटले, की आता ही तपासणी संपली. एकालाही हिच्या प्रकृतीची काहीही पडली नव्हती आणि एकानेही हिचं ‘रोगनिदान’(प्रोग्नॉसिस) काय, हा प्रश्न विचारला नव्हता. पुढच्या फोनकॉलने मात्र मी पार उडालो. तो होता तिच्या वकिलाचा. तिच्या नवऱ्याच्या वकिलाने तिच्या विरुध्द असा दावा केला होता, की ही आई, आई होण्याच्या लायकीची नाही, आणि मुलांची कस्टडी तिला देण्यात येऊ नये. कारण काय तर, ‘तिने मुलांना टीबी व्हावा ह्या हेतूने मुद्दाम त्यांचे मुके घेतले होते.’

कुठे भारतातील ती रमिला, तिचा कनवाळू गरीब बाप, तिचे शारीरिक हाल, तिला टीबीवर मिळालेली ट्रीटमेंट, आणि अमेरिकेतल्या टीबी रुग्णाचे बदलते सादरीकरण. दिसतोयं की नाही, टीबीचा बदललेला चेहरा!

## २०१५च्या बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशनात उत्तररंग परिषद

उत्तररंग हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा एक विभाग आहे. त्यामुळे २०१५च्या अधिवेशनात मंडळाच्या अन्य विभागांबरोबरच **उत्तररंगाचाही विचार केला जात आहे**. मराठी व्यवसाय परिषद (Business Conference) आणि CME परिषदेबरोबरच त्या दिवशी म्हणजे **२ जुलैला उत्तररंग परिषद** आयोजित करण्यात येत आहे.

काही मराठी मंडळांतर्फे ज्येष्ठ (म्हणजे५५वर्षाचे पुढील) सदस्यांसाठी मेळावे आणि कार्यक्रम असतात. तर काही गावात या वयोगटाचे मराठी लोक स्वतंत्रपणे जमतात. उत्तररंग हा या सर्वांना एका छत्राखाली आणणारा विचार आणि विभाग. तेव्हा उत्तर अमेरिकेतील अशा सर्व मराठी गटांना बरोबर घेऊन ही परिषद होणार आहे.

मराठी समाजात ५५ वर्षाचे पुढील लोकांची संख्या आता वाढत आहे. अर्थात उत्तर आयुष्याबद्दलचा विचार, जिव्हाळ्याच्या अनेक विषयांवर गप्पा, चर्चा आता आवश्यक वाटू लागल्या आहेत. हे विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ म्हणून गेली १०वर्षे बृहन्महाराष्ट्र वृत्तात उत्तररंग हे सदर चालू आहे. गावोगावी मेळावे, परिसंवाद आणि लहान परिषदा होत आहेत. मागील बऱ्याच अधिवेशनात त्याचे पडसाद म्हणून काही विषयांवर परिसंवाद झाले. अधिवेशनाची मांडणी अशी काही असते, की अशा परिसंवादाला जावे की एखाद्या मनोरंजक कार्यक्रमाला जावे, या संभ्रमात लोक सापडतात. तशी अडचण येऊ नये म्हणून २०१५च्या अधिवेशनात उत्तररंगासाठी स्वतंत्रपणे आणि पुरेसा वेळ दिला जाणार आहे. समान वयाच्या, आणि विचारांच्या मित्रांना भेटण्याची संधी, नवे मित्र जोडण्याचा योग, उत्तर रंगी लोकांसाठी प्रत्यक्ष आणि प्रतिमात्मक (virtual) वसाहतीची शक्यता, माहिती आणि अनुभवांची देवाणघेवाण, यासाठी ही परिषद !

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाच्या नोंदणी पत्रकात म्हणजे रजिस्ट्रेशन फॉर्मवर उत्तररंग परिषदेसाठी नाव नोंदवण्याची सोय असेल.**

या परिषदेचे यश आपल्या सर्वांच्या सहभागावर अवलंबून आहे. आपल्या सर्वांना या परिषदेत अगदी नियोजनापासून भाग घेण्याची संधी मिळावी, म्हणून याबद्दल पुरेशी आधी घोषणा करीत आहोत.

– ही परिषद उत्तररंगाचा विचार करणाऱ्या आपल्या सर्वांसाठी, आपणा सर्वांनी आयोजित केलेली परिषद असणार आहे; म्हणून या परिषदेला येण्याचे नक्की करा.

– या परिषदेत उत्साहाने भाग घ्या.

– आपल्या मित्रांना या परिषदेची माहिती सांगा.

– आपल्या गावातील मराठी मंडळाकडे ही माहिती पाठवा.

– मुख्य म्हणजे या परिषदेमध्ये काय विषय असावेत, काय कार्यक्रम असावेत, तुम्हाला कशा प्रकारे भाग घेण्याची इच्छा आहे, याबद्दलचे विचार, सूचना, कल्पना, **आमच्याकडे १५ जानेवारीपर्यंत पाठवा.**


२०१३च्या अधिवेशनात **उत्तरंग नामदर्शिका** प्रसिद्ध झाली आहे. तुम्हाला माहिती आहे का? तुमच्याकडे नामदर्शिकेची प्रत आहे का? अजूनही काही प्रती शिल्लक आहेत. (१०$). ही नामदर्शिका जितकी अचूक आणि परिपूर्ण असेल तितका तिचा आपल्या सर्वांना उपयोग होणार आहे. तेव्हा नामदर्शिकेतील तुमची माहिती अचूक करण्यासाठी मदत करा. मित्रांची नावे नसतील तर त्यांना कळवा.

उत्तरायुष्य हा आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग. आपल्या एकत्रित प्रयत्नांनी तो आणखी सुखाचा, आनंदाचा होणार आहे. त्यासाठी ही परिषद आहे. तुम्ही अधिवेशनाला येणार आहात ना? तर मग उत्तरंग परिषदेसाठी २ जुलै २०१५ हा वेगळा दिवस राखून ठेवा. अधिक माहितीसाठी, परिषदेत भाग घेण्यासाठी संपर्क:

**- अशोक सप्रे** (ashoksapre@gmail.com)

नामदर्शिकेसाठी संपर्क:

**- मोहन रानडे** (brihanmm@gmail.com)




## ग्रंथ:"साईंच्या सान्निध्यात"

साई अवतार काळातील निवडक ७७ भक्तांच्या चरित्र चित्रांच्या माधमातून अव्यक्त साईंचा घेतलेला शोध व बोध. अनेक दुर्मिळ छायाचित्रे.


प्रकाशित प्रथमावृत्ती साडेतीन महिन्यांत संपली. आता द्वितीय आवृत्तीकडे ...

**लेखिका**: सौ मुग्धा सुधीर दिवाडकर

**संपर्क**:+91 93233 43583/ mugdha54@rediffmail.com

For more details, Please visit - ***http://bit.ly/sai-fb***

## PART OF THE FAMILY?




A book '**PART OF THE FAMILY'** [2014, Kindle Edition] written by **Sheila Bapat,** (daughter of Madhuri Bapat (Phoenix, AZ) is about the movement of Nannies, Housekeepers, Caregivers and the Battle for Domestic Workers' Rights for recognition of dignity and justice. The author- **Sheila Bapat** lives in San Francisco, California. She is an attorney and a journalist, and holds a JD (Juris Doctor - a professional doctorate and first professional graduate degree in law) from the University of Pennsylvania School of law.




A key premise of this book is that domestic labor is often considered to be void of economic value, and that the current movement for domestic workers' rights is doing critical work to change the perception. This book chronicles rising political and social movement for securing labor protections for domestic workers, who toil in our homes for cleaning, cooking and caring our children and elders, and yet a mostly forgotten sector of the labor force. Per one of the academic study cited in this book, more than 90 percent (%) of domestic workers in the U.S. are women, many of these workers are below poverty wages, some are exploited and abused, living in uncertainty, depending on whims of their employers, 25 % are unmarried with children, 20 % are immigrants, and often unaware of their rights.

Sheila Bapat in her book, has presented a thorough study of theoretical framework, 'Slavery and domestic work-Then and Now', with a comprehensive view of relevant global history, and real stories of caregivers from New York and California to Geneva and beyond, state campaigns, and domestic workers struggles for dignity and justice. Hopefully, this book- 'Part of the Family?' will inspire, social and political movements, and policy-makers at State and federal level, for changes to improve job- conditions and legal protections for domestic workers.

**- Vinata Kulkarni**

## चित्र-कल्पना: पल्लवी राजवाडे, विनता कुलकर्णी



# भैरवी

मला शास्त्रीय संगीत कळायला लागल्यानंतर त्यातील काही राग, काही ताल जास्त आवडू लागले. यमन हा राग तर अनेक जणांच्या आवडीचा. सुधीर फडके ऊर्फ बाबूजींपासून कित्येक संगीतकारांनी या रागात एकापेक्षा एक सुंदर चाली बांधल्या आहेत. यमन राग आता काहीतरी सुंदर चालू होणार असा आभास निर्माण करतो. तर मारवा राग संध्याकाळची उदासीनता भासवून मन विषण्ण करतो. सारंग हा दुपारचा राग ऐकला, की मला लग्नाच्या पंगती बसल्या आहेत आणि जिलबीचा आग्रह होत आहे, असे वाटू लागते. रागाची मांडणी करण्यास गायकाने विलंबित तालात बारा मात्रांचा एकताल, अथवा सोळा मात्रांचा तीनताल निवडला, की ही stopping at all station गाडी वेग कधी घेणार याकडे माझे लक्ष लागते. त्याउलट गायकाने मध्यलयीत गायचे ठरवून दहा मात्रांचा झपताल अथवा सात मात्रांचा रूपक निवडला, तर मी लगेच सरसावून बसतो.

मैफल संपविताना गायकाने भैरवीचे सूर आळवले, की मात्र अगदी विचित्र परिस्थिती होते. हे सगळे चांगले चालले होते ते आता संपणार अशा पूर्वसूचनेची ती हाक आहे, हे उमजून मी अस्वस्थ होतो. आजच्या सारखीच अशीच चांगली मैफल आणखी काही दिवसांनी ऐकायला मिळेल, अशी मनाची समजूत घालण्याइतके मनोधैर्य ते सूर देतात. तरीपण आजचे चांगले संपले ही विषण्णता त्या सूरात असतेच.

हे चांगले चाललेले तात्पुरते संपले याबद्दल विषाद वाटण्याचा एक वेगळा अनुभव सध्या घेत आहे. माझ्या दोन वर्षाच्या नातीकडे गेलो, की तेथून घरी परतताना तिचा होणारा रडवेला चेहेरा भैरवीसारखी विषण्णता आणतो. ती तिच्या आई/वडिलांच्या खांद्यावर असते, त्यामुळे रडत नसते. पण मी कितीही वेळा हंसत 'बाय' म्हटले, तरी ती अगदी केविलवाणा चेहेरा करीत नाईलाजाने हात वर करते. अजूनही बोलण्याची समज न आलेल्या त्या चिमुरडीला काय वाटते ते तिचा चेहेराच सांगतो. शब्दांची जरूरी नसते. माझी आई अमेरिकेत काही दिवस वास्तव्याला आली आणि मी ऑफिसला निघालो, की ती असाच चेहरा करून दारात उभी राहायची. 'आता दिवसभर कैद' हे शब्द त्या चेहेऱ्यावर मला बिलबोर्डाच्या अक्षरांएवढे मोठे स्पष्ट दिसत. संध्याकाळी परत येणाऱ्या काही तासाच्या सहवासाच्या प्रतिक्षेत ती दिवस रेटण्यास सज्ज व्हायची.

गायक निष्णात असला तर भैरवीतील कोणते सूर श्रोत्यांच्या अंत:करणाला हलवून टाकतील हे त्याला पक्के ठाऊक असते. अशावेळी श्रोते हमखास खिशातील हातरूमाल काढतात. ते अश्रू लपवून ठेवण्याची जरूर वाटत नाही. त्या सूरांनी थेट तुमच्या भावनांना हेलावलेले असते. सभोवतालचे जग विसरून मैफिलीच्या स्वरानंदात संपूर्ण नाहून निघाल्याचा आनंदच ते अश्रू व्यक्त करीत असतात.

डिसेंबर महिना उजाडला, की मला आता भैरवीची वेळ आली असे वाटते. गायकाने मैफिलीची सुरुवात करताना आज काय आणि कसे गायचे याचे आडाखे मनाशी बांधलेले असतात. प्रत्यक्षात अगदी तशीच मैफल पार पडतेच असे नाही. मैफिलीच्या सुरवातीला काही वेळा आवाज साथ देत नाही, तंबोरे नीट जुळत नाहीत, साथीदारांची वाद्ये बेसूर होत राहतात. त्या सर्वांवर मात करीत गायक मैफल यशस्वी करण्याचा प्रयत्न करतो. वर्षभरात प्रत्येकाच्या आयुष्यातसुद्धा ऊनपावसाचे दिवस येतात. आपण कायम लक्षात ठेवतो ते फक्त सोनेरी दिवस.

जानेवारी महिन्यात यावर्षी काय करायचे याचे मनसुबे आपण रचलेले असतात. डिसेंबर महिन्यापर्यंत अथवा वर्षाअखेर त्यातील किती गोष्टी पूर्ण केल्या, कितींना हातही लावता आला नाही, किती सुरू करून अर्धवट राहिल्या, किती सपशेल फसल्या याचा आढावा घेतला जातो. हा गेलेला काळ आता आयुष्यात परत येणार नाही हे वास्तवही आपण जाणतो. ज्यांचे संपूर्ण वर्ष अगदीच वाईट गेले असेल ते पुढचे वर्ष असे असणार नाही अशी आशा करीत असतात. वर्ष चांगले गेले असेल तर नूतन वर्षात आणखीन काही करण्याची उमेद बाळगतात. मैफिलीच्या शेवटी भैरवी म्हणून मैफिलीची सांगता करण्याचा हा रिवाज आपण आयुष्यात अजाणतेपणाने पाळत असतो, तो पुढच्या मैफिलीची तितक्याच जोमाने तयारी करण्यासाठी.

तुम्हा सर्वांची भैरवी अशीच आशावादी असू दे, एवढीच शुभेच्छा!

**- मोहन रानडे** (फिलाडेल्फिया)

## ई - विभाग

**लेख: पुन्हा एकदा 'श्यामची आई' - माधव वझे (पुणे)**

**कविता: देशप्रेम - सौ. अरुंधती सरपटवारी (बाल्टिमोर, मेरीलँड)**

**Kids' Corner: Story: - Stroke Play**
By- **Rajiv Tambe** (Dombivali (E) MS, India)

**राशिभविष्य: जानेवारी, २०१५ - दादा दामले (न्यू जर्सी)**

**वाचण्यासाठी संकेतस्थळ: click or visit-**
**http://www.bmmonline.org/vrutta-esahitya/**


**DR MOHAN DURVE PRESENTS**
**PRE & POST**
**BMM CONVENTION 2015 in LA**



*** Canadian Rockies**
Pre BMM Convention- **Jun 26 -Jul 2, 2015**
Calgary, Waterton Lake & Glacier Nat'l parks,
Columbia Ice Field, "Going to the Sun Road", Banff, Calgary
$2299 / PP Land only Double occupancy

*** Alaska Cruise**
Post BMM Convention- **July 5- July 12 2015**
Seattle, Ketchikan, Tracey Arm Scenic Sailing, Juneau,
Skagway, Victoria (British Columbia), Seattle
$704 inside Balcony $1554, Port Charge $245,
PP/ Double occupancy
*Contact*: 888-794-1995 or 440-845-7272
www.CMETravels.com *new* cmetravelsmd@gmail.com
mjdurve@sbcglobal.net
Non physicians, friends & family most welcome!
Price is subject to change. CME available.



*Now is the time to contact:*

Yasmin Kevala
Senior Real Estate Specialist
Sparkman Realty, Inc.
Cell: **813-380-0064**
yasminhomes@verizon.net

**Tampa Bay Area in Florida is ideal for Retirement and...**

*Yasmin, a Parsi from Bombay, understands your needs and values.*
*Yasmin has helped several Indo-Americans move to theTampa Bay area.*

*We invite you to enjoy with us a year-round temperate climate, convenient airports, universities, beaches, theme parks and much more...*
More details at: **TampaBayUpscaleHomes.com**



- Affordable houses in all price ranges.
- Great housing deals for all age groups.




Mandke
**Lighthouse**
Investment.Appreciation.Pleasure
GUHAGAR, KONKAN

Highlights - ▪ 18 Mtr. Wide Main Roads ▪ 12 Mtr./9 Mtr. Wide Internal Roads ▪ Five Star Hotel ▪ Budget Hotel ▪ Entertainment Club & Theatre ▪ Twin Bungalows ▪ Shopping Mall ▪ Health Care Centre ▪ Studio Apartments ▪ Bird Watching Area ▪ 'Shrimant Lake' of Peshwas and many more .....


BEACH HOTELS


NATUROPATHY & WELLNESS CENTRE


PARASAILING & WATER SPORTS

**आपली कुलदैवते आपल्यापासून हाकेच्या अंतरावर!**

www.sudhirmandke.com | info@sudhirmandke.com | Tel: +91-20-25652521

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408

# MAHARASHTRA FOUNDATION

Social & Economic Justice for All

*(NGO in Special Consultative Status with the Economic and Social Council of the United Nations)*

**Support Our Project in 2015, with NGO Partner-**

## 'Pragat Shikshan Sanstha', (Phaltan), India

## Potli Project: Taking Education to home

Tax Exemption ID Under IRS Section 501 (c)(3) 22-2213611

United Way NY, NJ, CT Agency Code: 011675

PO Box 2287, Church Street Station, New York, NY 10008-2287



- **Early Childhood care & education upto 6 years of age**
- **Support group for children in Age group 6-12 years**
- **Trained 'Sakhis' to provide care & education**
- **Target population 120 children**

**For Details, Visit: http://www.maharashtrafoundation.org**